SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 Email – affiliationt1@unishivaji.ac.in
FAX : ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९३२९४ व २६९२३३३.
Estd: 1962
NAAC 'A' Grade

एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/माने/ 472 दिनांक 17 JUN 2023

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, शारीरिक शिक्षण,
शिक्षणशास्त्र, विधि, महाविद्यालये.

विषय:- संलग्नित महाविद्यालयातील एम.फिल अर्हता धारक शिक्षकांना कॅसचे लाभ देण्याबाबत विद्यापीठाने संदर्भ पत्र क्रं. Affi/T.1/MAK/190/63/ १७ डिसेंबर २००९ रोजी युजीसीला पाठविलेल्या पत्रासोबत जोडलेल्या यादीतील ६९८ व संदर्भ पत्र क्रं. Affi/T.1/MAK/72 २३ एप्रिल २०१० रोजी युजीसीला पाठविलेल्या पत्रासोबत जोडलेल्या ७९ शिक्षकांच्या यादीतील ज्या शिक्षकांनी दि. ११ जुलै २००९ पर्यंत एम.फिल अर्हता धारण केलेली आहे अशा एम.फिल अर्हता धारण केलेल्या व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या शिक्षकांच्या स्थाननिश्चितीच्या अनुषंगाने M.Phil धारक शिक्षकांच्या स्थाननिश्चितीसाठी विशेष शिबीर आयोजित करणेबाबत.
संदर्भ:- एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/माने/१७६ दि.२८.०४.२०२३

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने क्रं. संकीर्ण/२२०४/प्र.क्रं९१/विशि-१/१९.११.२०२२ च्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे तसेच पुन्हा पत्र क्रं. संकीर्ण-२२०४/प्र.क्रं९१/विशि-१ दि.१६.०२.२०२३ ने कळविल्याप्रमाणे ज्या शिक्षकांची निवड समितीच्या माध्यमातून दि.१४.०६.२००६ पूर्वी नियुक्त झालेली आहे व ज्यांनी सेवेत असताना दि.०१.०१.१९९४ ते दि.११.०७.२००९ या कालावधीत एम.फिल ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे, तसेच ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील अर्हतेच्या आधारे नेट मधून सुट दिलेली आहे व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे, असे अध्यापक एम.फिल अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र आहेत, तसेच ज्या अध्यापकांनी दि.१४.०६.२००६ पूर्वी नियुक्तीवेळी एम.फिल अर्हता धारण केली होती, अशा अध्यापकांची नियुक्ती जर विहित निवड समितीच्या माध्यमातून झाली असेल, तसेच अशा अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फिल अर्हतेच्या आधारे नेट परीक्षेमधून सुट देऊन त्यांच्या नावासहित तसे संबंधित विद्यापीठांना कळविलेले असेल व विद्यापीठाने नियमित स्वरुपात मान्यता दिलेली असेल, तर (१) ज्या अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फिल. अर्हता धारण केली असेल, त्यांना नियुक्तीपासून व (२) ज्यांनी सेवेत असताना एम. फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील असे कळविले आहे.

तथापि, शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार युजीसीने संदर्भ क्रं.F.1-1/2006 (PS) Meeting दि.१९ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये नेट/सेट दोन वर्षात पूर्ण करण्याच्या अटीवर मान्यता दिलेल्या आहेत. परंतु या मान्येतेच्या यादीमधील ज्या शिक्षकांनी दि.०१.०१.१९९४ ते दि.११.०७.२००९ या कालावधीमध्ये एम.फिल अर्हता धारण केलेली आहे व एम.फिल अर्हता ग्राहय धरुन विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या शिक्षकांचे स्टेज २ ते स्टेज ५ कॅसचे प्रस्ताव महाविद्यालयाकडून मागवून घेऊन व त्यांची स्पेशल कॅम्प आयोजित करुन स्थाननिश्चितीबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे. व त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये सर्व महाविद्यालयांना प्रस्ताव पाठविणेबाबत कळविण्यात आले आहे.

तथापि, शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने संलग्नित महाविद्यालयीन एम.फिल अर्हता धारक शिक्षकांना कॅसचे लाभ देण्याबाबत विद्यापीठ संदर्भ पत्र क्रं. Affi/MAK/१९०/६३/ दि.१७ डिसेंबर २००९ रोजी युजीसीला पाठविलेल्या पत्रासोबत जोडलेल्या यादीतील ६९८ शिक्षकांच्या यादीतील ज्या शिक्षकांनी दि. ११ जुलै २००९ पर्यंत एम.फिल अर्हता धारण केलेली आहे अशा एम.फिल अर्हता धारण केलेल्या व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या आहेत अशा शिक्षकांच्या बाबतीतही फक्त महाविद्यालयीन शिक्षकांचे बाबतीत महाविद्यालयाकडून प्रस्ताव मागवून घेऊन त्यांचा स्पेशल कॅम्प आयोजित करुन अधिकार मंडळाच्या मान्यतेच्या अधिन राहून स्थाननिश्चितीबाबतची कार्यवाही विद्यापीठ प्रशासनामार्फत करण्यात येणार आहे.

याबाबत आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, संलग्नित महाविद्यालयीन एम.फिल अर्हता धारक शिक्षकांना कॅसचे लाभ देण्याबाबत विद्यापीठाने संदर्भ पत्र क्रं. Affi/T.1/MAK/190/63/ दि.१७ डिसेंबर २००९ रोजी युजीसीला पाठविलेल्या पत्रासोबत जोडलेल्या यादीतील ६९८ व संदर्भ पत्र क्रं. Affi/T.1/MAK/72 दि.२३ जुलै २०१० रोजी युजीसीला पाठविलेल्या पत्रासोबत जोडलेल्या ७९ शिक्षकांच्या यादीतील ज्या शिक्षकांनी दि.११ जुलै २००९ पर्यंत एम.फिल अर्हता धारण केलेली आहे अशा एम.फिल अर्हता धारण केलेल्या व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या आहेत अशा शिक्षकांनी माहे २० जून २०२३ ते ३० जून २०२३ पर्यत विहित शुल्क भरुन दि. ५ जुलै २०२३ पर्यंत विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करावेत. विहित शुल्क भरुन तसेच सदर प्रस्तावासोबत विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द केलेले **विद्यापीठाचे पत्र व त्यामधील संबंधीत शिक्षकांचे नाव असलेल्या पानाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.** तसेच स्थाननिश्चितीबाबतची सर्व आवश्यक ती कागदपत्रे जोडून प्रस्तावावर **"M.Phil धारक शिक्षकांच्या स्थाननिश्चितीसाठी विशेष शिबीर"** असा स्पष्ट उल्लेख करुन प्रस्ताव दि.५ जुलै २०२३ पर्यंत सादर करावेत. प्राप्त प्रस्तावामधील प्रथम स्टेज २ व स्टेज ३ बाबतची अधिकार मंडळाच्या मान्यतेच्या अधिन राहून स्थाननिश्चितीची कार्यवाही केली जाईल व त्यांनतर स्टेज ४ व स्टेज ५ बाबतची कार्यवाही केली जाईल.

सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे. सदरचे विशेष शिबीर आयोजनानंतर पुन्हा विशेष शिबीर आयोजित करण्यात येणार नसल्याने त्याबाबतचे प्रस्ताव हे वेळेत सादर करण्याबाबतची तसेच प्रस्ताव विलंबाने प्राप्त झालेस व त्याबाबत स्थाननिश्चितीची कार्यवाही पुर्ण होऊ न शकलेस याबाबतची सर्व जबाबदारी ही संबंधित शिक्षक व प्राचार्य यांची राहिल याची नोंद घ्यावी. **उपरोक्त संदर्भानुसार ज्यांनी अर्ज केलेले आहेत त्यांनी पुन:श्च अर्ज करु नयेत.**

**विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular/Affiliation T.1/ Affiliation T.1 Circular येथे कार्यालयाचे संदर्भ पत्र क्रं. Affi/T.1/MAK/१९०/६३/ दि.१७ डिसेंबर २००९ रोजी युजीसीला पाठविलेल्या पत्रासोबत जोडलेल्या यादीतील ६९८ शिक्षकांची यादी व पत्र क्रं. Affi/T.1/MAK/72 दि. २३ एप्रिल २०१० रोजी युजीसीला पाठविलेल्या पत्रासोबत जोडलेल्या ७९ शिक्षकांची यादी 'Special Camp for M. Phil qualified teachers' या मथळयाखाली ठेवण्यात आलेली आहे.**

कळावे,

आपला विश्वासू

( जी. आर. पळसे )
उपकुलसचिव
संलग्नता टी.१ विभाग